159 125

निपत वयोमान सेवानिवृत्त होताना शासकीय क
कर्मचा-यांच्या खाती शिल्लक असलेल्या अर्धवेतनी
रजेचे रोखीकरण.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक अरजा-२४९३/६७/सेवा-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ७ मे, १९९४.

शासन निर्णय

शासनाने असा निर्णय घेतला आहे की, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-याला, सेवानिवृत्तीच्या दिनांकाला त्याच्या खाती शिल्लक असणा-या संपू अर्धवेतनी रजेचे रोख सममूल्य, खालील अटींवर मंजूर करण्यात यावे.

[१] रोख सममूल्याच्या रकमेमधून सेवानिवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभांचे निवृत्ती -वेतन सममूल्य वजा करण्यात येईल.

[२] रोख सममूल्य हे अर्धवेतनी रजेच्या बाबतीत अनुज्ञेय असलेल्या रजा वेतनाइतके असेल आणि शासकीय कर्मचारी ज्या तारखेस सेवानिवृत्त होईल त्या तारखेस अंमलात असलेल्या दराने महागाई भत्ता, देय असला तर, तो अर्जित रजेसह रजेच्या पहिल्या २४० दिवसांच्या रजा वेतनावर मिळेल.

[३] अर्धवेतनी रजेच्या रोख सममुल्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल

$$\text{अर्धवेतनी रजेचे रोख सममूल्य} = \frac{\text{अर्धवेतनी रजा वेतन + अनुज्ञेय असल्यास त्यावरील महागाई भत्ता वजा निवृत्तीवेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभांचे निवृत्तीवेतन सममल्य आणि अर्धवेतनी रजा वेतनावर महागाई भत्ता अनुज्ञेय असल्यास, निवृत्तीवेतनावरील वाढ}}{30} \times \text{नियत वयमा सेवानिवृत्ती च्या तारखे देय असलेल्या अर्धवेतनी र दिवस.}$$

[४] अर्धवेतनी रजेचे रोख सममूल्य वरीलप्रमाणे परिगणित करण्यात यावे व ते अर्जित रजेच रोख सममुल्याबरोबर देण्यात यावे.

[५] वरीलप्रमाणे परिगणीत करून करण्यात आलेली रक्कम एकाचवेळी एका ठोक रकमेत देण्यात यावी.

[६] अर्धवेतनी ~~र~~ रजावेतन हे निवृत्तीवेतन व इतर निवृत्तीविषयक लाभांच्या रकमेहून कमी असेल तर अर्धवेतनी रजेचे रोख सममूल्य दिले जाणार नाही.

३. वरील आदेश दिनांक १ एप्रिल, १९९३ पासून अंमलात येतील.

४. महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम, १९८१ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदीमध्ये या शासन निर्णयाच्या तरतुदीपुरती सुधारणा करण्यात आली आहे असे समजण्यात यावे. उ नियमांत यथावकाश रितसर सुधारणा करण्यात येईल.

५. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. स. बसनाक,
शासनाचे अवर सचिव.

---

क्र.आस्थापना/अकावि/३२८/९४,
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
दिनांक : ९-८-१९९४.

प्रति,
तहसीलदार [सर्व], उपविभागीय अधिकारी [सर्व]
विशेष भू संपादन अधिकारी [सर्व], कार्यालयप्रमुख [सर्व]
यांजकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही साठी रवाना.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी करिता.

बि/९८९४...